NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १७५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि. १३ जून, २०२४ सकाळी ११:०० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १७५ वी बैठक **गुरुवार, दि.१३ जून, २०२४ रोजी सकाळी ११:०० वा.** मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ७) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १६) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे, प्र. वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| १९) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

स्वागत:

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

अनुपस्थिती:

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते व डॉ. अजित माधव पाटणकर यांनी दूरध्वनीद्वारे अनुपस्थिती कळविली होती, त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | दि. ०७ जून, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७४ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.०७ जून, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७४ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **शास्त्रीय उपकरण केंद्राकडील उपलब्ध असलेली शास्त्रीय उपकरणे उपयोगी आहेत अथवा नाहीत तसेच त्यावरती किती रक्कम खर्च झाली याबाबतचा समितीचा अहवाल माहितीस्तव.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या दि.१० जुलै, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या बैठकीमध्ये अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी शास्त्रीय उपकरण केंद्राकडील उपकरणाविषयी ठराव क्र. ५(६) अन्वये माहिती विचारण्यात आलेली होती. त्यानुसार शास्त्रीय उपकरण केंद्राने दि.२५/०८/२०२३ रोजीच्या मा.कुलगुरुमहोदयांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे सदस्यांचे नामनिर्देशन केले होती.<br>अ.क्र. / सदस्यांचे नाव / अध्यक्ष / सदस्य<br>१) डॉ. बी. जे. लोखंडे — अध्यक्ष<br>२) डॉ. सौ. अंजना एस. लावंड — सदस्य<br>३) डॉ. राजीवकुमार एस. मेंते — सदस्य<br>सदर सदस्यांनी शास्त्रीय उपकरण केंद्राकडील उपलब्ध असलेली शास्त्रीय उपकरणे उपयोगी आहेत अथवा नाहीत याबाबत तपासणी करुन गठीत केलेल्या समितीने सोबत जोडलेल्या पत्राप्रमाणे सविस्तर अहवाल दिला आहे.<br>सबब, शास्त्रीय उपकरण केंद्राकडील उपलब्ध असलेली शास्त्रीय उपकरणे उपयोगी आहेत अथवा नाहीत तसेच त्यावरती किती रक्कम खर्च झाली याबाबतचा समितीचा अहवाल माहितीस्तव. | शास्त्रीय उपकरण केंद्र |
| ठराव: | **शास्त्रीय उपकरण केंद्राकडील उपलब्ध असलेली शास्त्रीय उपकरणे उपयोगी आहेत अथवा नाहीत तसेच त्यावरती किती रक्कम खर्च झाली याबाबत समितीने सादर केलेल्या अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०३] | **व्यवस्थापन परिषदेच्या दि.०५ मार्च, २०२४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.८ च्या अनुषंगाने शै. वर्ष २०२३-२४ मधील मार्च / एप्रिल २०२४ च्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचे डी.टी.पी., टाईप सेटिंग, प्रुफ रिडींग करुन वेळापत्रकानुसार प्रश्नपत्रिका ऑनलाईन ई-मोड (SRQPD) प्रणालिद्वारे गोपनीय पध्दतीने परीक्षाकेंद्रावर पाठविण्याच्या कामासाठी SHPC Technologies Pvt. Ltd, Mumbai या गोपनीय फर्मकडून करुन घेण्याकरिता वर्क ऑर्डर देण्यात आल्याची बाब माहितीस्तव.**<br>टिपणी: विद्यापीठाच्या विविध परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचे डी.टी.पी., टाईप सेटिंग, प्रुफ रिडींग करुन वेळापत्रकानुसार प्रश्नपत्रिका ऑनलाईन ई-मोड (SRQPD) प्रणालिद्वारे गोपनीय पध्दतीने परीक्षाकेंद्रावर पाठविण्याच्या कामासाठी SHPC Technologies Pvt. Ltd, Mumbai या गोपनीय फर्मला वर्क ऑर्डर देण्याबाबत केलेली कार्यवाही / घटनाक्रम खालीलप्रमाणे आहे.<br>• ई-निविदा प्रक्रिया करुन कार्यालयीन आदेश क्र.पुअहोसोविसो/ पवमूमं/ १३१५, दि.१६/०६/२०२३ रोजी न्युनतम दर असलेले SHPC यांना First (मार्च/एप्रिल, २०२३ च्या परीक्षेकरीता) Rs.२५० + १८% (GST) Rs.२९५/- Rate Per Paper प्रमाणे वर्क ऑर्डर देण्यात आली आहे.<br>• कार्यालयीन आदेश क्र.पुअहोसोविसो/पवमूमं/२६४५, दि.१७/११/२०२३ नुसार SHPC यांना Extension Work Order (ऑक्टो/नोव्हें, २०२३ च्या परीक्षेकरीता) Rs.२५० + १८% (GST) Rs.२९५/- Rate Per Paper प्रमाणे वर्क ऑर्डर देण्यात आली आहे.<br>• ग्राफ शिट छपाई करुन घेण्याकरिता वित्त व लेखा खरेदी विभागामार्फत दरपत्रके मागविण्याची कार्यवाही करण्यात येवून कार्यालयीन आदेश क्र. पुअहोसोविसो/ पवमूमं/२९९४, दि.१९/१२/२०२३ नुसार ग्राफ शिट कामासाठी (ऑक्टो/नोव्हें, २०२३ च्या परीक्षेकरीता) Rs.२५० + १८% (GST) Rs.२९५/- Rate Per Unit Graph Sheet प्रमाणे वर्क ऑर्डर देण्यात आले आहे.<br>ई-निविदा प्रक्रिया (मार्च / एप्रिल, २०२४ पासून पुढील चार सत्रांकरीता)<br>१. दि.०५/१०/२०२३ रोजीची ई-निविदा मसुदा मान्यता.<br>२. दि.०९/१०/२०२३ वर्तमान पत्र नामनिर्देशन मान्यता.<br>३. खरेदी व भांडार (वित्त व लेखा) विभाग यांनी दि.१२/१०/२०२३ ते दि.२६/१०/२०२३ या कालावधीत ई-निविदा मागविण्याची प्रक्रिया करुन दि.११/१२/२०२३ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये न्युनतम दर (L१) असलेल्या फर्म M/s. Weshine Tech pvt. Ltd, Pune हे असल्याने पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर प्रमाणे M/s. Weshine Tech pvt. Ltd, Pune वर्क ऑर्डर देण्यासाठी दि.०८/०१/२०२४ रोजी टिपणी सादर करण्यात आली.<br>४. मा. कुलगुरुमहोदय यांना दि.०८/०१/२०२४ रोजी सादर केलेल्या टिपणीत नमुद संदर्भ क्र.१ ते ६ अनुसरुन मा.प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली दि.३०/१२/२०२३ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र.६ नुसार फर्म समवेत करार करण्यापुर्वी व कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी प्रत्यक्षात परीक्षेच्या गोपनीय कामाच्या कार्यपध्दतीचे प्रात्यक्षिक परीक्षा विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यासमोर दिल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याबाबत नमुद करण्यात आलेले आहे. सदर टिपणीवर प्र.संचालक, पवमूमं यांनी दि.१६/०१/२०२४ रोजी मा. कुलगुरुमहोदय यांच्या समवेत झालेल्या चर्चेनुसार (१) दि.२९/१२/२०२३ रोजी IUMS चे ई-टेंडर प्रसिध्द | परीक्षा व मूल्यमापन विभाग |

करण्यात आलेले आहे. त्यानंतर याबाबत कार्यवाही करावे असे निर्देश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार काय्रवाहीकरिता दि.०८/०२/२०२४ रोजी सदरचे फोल्डर पुन्हा DBEE च्या व्य. प. मध्ये अंतिम मान्यतेकरीता सादर करण्यात आले असून, त्यांच्याकडे QPDS चा निर्णय अंतिम होणार आहे. त्यामुळे QPDS नविन फर्मकडून करुन घेण्यात येईल त्याकरिता फर्म निश्चितीनंतर फेर सादर करावे, असे पृठांकन केलेले आहे.

५. मार्च/एप्रिल, २०२४ या सत्रातील परीक्षांचे प्रश्नपत्रिकांचे डी.टी.पी., टाईप सेटिंग, प्रुफ रिडींग करुन वेळापत्रकानुसार प्रश्नपत्रिका ऑनलाईन ई-मोड (SRQPD) प्रणालिद्वारे गोपनीय पध्दतीने परीक्षाकेंद्रावर पाठविण्याच्या कामासाठी गोपनीय फर्म निश्चित करण्यासाठी दि.०२/०३/२०२४ रोजी टिपणी सादर केली असता, मा. संचालक यांनी खालीलप्रमाणे पृष्ठांकन केले व त्यास मा. कुलगुरुमहोदय यांनी मान्यता दिली.

पृष्ठांकन: "IUMS चे ई-टेंडरबाबत अंतिम निर्णय घेण्याकरीता विषय दि.०५/०३/२०२४ च्या व्य. प. मध्ये याबाबत अंतिम निर्णय घेण्याकरीता वित्त व लेखा विभागाची शिफारस ठेवण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही करता येईल असे वाटते. असे व नविन पुरवठाधारक Edulab च्यांच्याकडून कार्यवाही करता येईल."

६. कार्यालयीन आदेश क्र.Ref/No.६०६, दि.१५/०३/२०२४ नुसार M/s. Edulab Education Exchange Pvt. Ltd, Mumbai यांना वर्क ऑर्डर दिल्याची प्रत ईमेलद्वारे प्राप्त झालेली आहे. परंतु सदर वर्क ऑर्डर मध्ये डी.टी.पी. च्या कामाबाबतचा कोठेही उल्लेख असल्याचे दिसून आले नाही.

७. त्यानंतर तत्कालिन प्र.संचालक, पवमूमं व विद्यमान संचालक, पवमूमं यांनी दि.०५ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या विषय क्र. (८) च्या ठरावाची प्रत विभागास दिली व त्याचा उल्लेख करुन टिपणी सादर करण्याचे तोंडी आदेश दिले होते. याबाबत विभागाने सदरच्या ठरावात नमुद कंपनी समवेत या विभागाच्या विषयांकित कामासंबधीत कोठेही उल्लेख नसल्याची बाब तत्कालिन मा.प्र.संचालक व विद्यमान मा. संचालक यांच्या निदर्शनास आणुन दिली असता, त्यांनी ठरावामध्ये दुरुस्ती करुन मिळेल असे तोंडी सूचित केले होते. व्यवस्थापन परिषदेची १७० वी (तातडीची) बैठक मंगळवार दि.०५ मार्च, २०२४ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीतील विषय क्र. ०८ चा ठराव खालीलप्रमाणे आहे.

"ICTRD, व्हेरीटोस व Splashgain Software कंपनीच्या परीक्षा व इतर विभागातील कामकाजातील अकार्यक्षमतेमुळे सदर कंपनीला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्याची अधिसभेने केलेली शिफारस खालील कारणास्तव सर्वानुमते अमान्य करण्यात आली.

१) सदर कंपन्याविरुध्द कोणतीही लेखी तक्रार विद्यापीठाकडे आलेली नाही.
२) सदर कंपन्याना ब्लॅकलिस्ट केल्यास त्यांच्याकडील विद्यापीठाच्या डेटापासून आपणास वंचित रहावे लागेल.
३) नवीन कंपनीस डेटा मायग्रेट (Migrate) व इंपोर्ट (Import) करण्यास बराच कालावधी लागणार आहे आणि आपणाकडे सध्या कोणतीही पर्यायी व्यवस्था नाही."

या कारणास्तव मार्च/एप्रिल, २०२४ च्या परीक्षेचे काम संबंधीत कंपनीस देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली व पर्यायी व्यवस्थेची तात्काळ व्यवस्था करणेची प्रक्रिया सुरु करावी असे ठरले.

८. मा.कुलगुरु महोदय यांना दि.१५/०३/२०२४ रोजी सादर केलेल्या टिपणीत मार्च/एप्रिल, २०२४ च्या परीक्षेचे विषयांकित काम कोणत्या फर्मकडून करुन घ्यावे याबाबत आदेशार्थ सादर करण्यात आलेल्या टिपणीवर मा.संचालक, पवमूमं यांनी पारित झालेल्या ठरावानुसार तसेच यापुर्वी Edulab A प्रमाणे P.O. देण्यास मान्यता असावी. (SHPC) असे पृष्ठांकन केले या पृष्ठांकनास मा. कुलगुरुमहोदय यांनी दि.१५/०३/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे.

९. मा. संचालक, पवमूमं यांची दि.१५/०३/२०२४ रोजी वर्क ऑर्डर मसुदा मान्यता.

१०. मार्च/एप्रिल, २०२४ च्या परीक्षांच्या ऑनलाईन ई-मोड (SRQPD) प्रणालिद्वारे गोपनीय पध्दतीने परीक्षाकेंद्रावर पाठविण्याच्या कामासाठी तसेच ग्राफ पेपर शिटच्या कामासाठी कार्यालयीन आदेश क्र.पुअहोसोविसो/पवमूमं/६१३, दि.१५/०३/२०२४ नुसार SHPC यांना (मार्च/एपिल, २०२४ च्या परीक्षे डी.टी.पी. करीता) Rs.२५० + १८% (GST) Rs.२९५/- Rate Per Paper व ग्राफ पेपर शिटकरीता Rs.२५० + १८% (GST) Rs.२९५/- Rate Per Unit Graph Sheet प्रमाणे वर्क ऑर्डर देण्यात आली.

सबब, दि.१५/०३/२०२४ रोजीच्या टिपणीवर "पारित झालेल्या ठरावानुसार तसेच यापूर्वी Edulab A मध्ये DTP उल्लेख नाही करीता परीक्षा विषयक बाब अत्यंत महत्वाची असल्यामुळे व आचारसंहिता लवकरच लागणार असल्यामुळे नविन निविदा प्रक्रिया करता येणार नाही करीता व्य. प. ठराव दि.०५ मार्च, २०२४ अन्वये A प्रमाणे P.O. देण्यास मान्यता असावी" असे पृष्ठांकन मा.संचालक यांनी केले त्यास मा.प्र-कुलगुरु, मा.कुलगुरु महोदय यांनी मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र.पुअहोसोविसो/पवमूमं/ ६१३, दि.१५/०३/२०२४ नुसार SHPC Mumbai यांना मार्च/एप्रिल, २०२४ करीता यापुर्वीच्याच दराने वर्क ऑर्डर देण्यात आल्याची बाब माहितीस्तव.

ठराव: **व्यवस्थापन परिषदेच्या दि. ०५ मार्च, २०२४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.८ च्या अनुषंगाने शै. वर्ष २०२३-२४ मधील मार्च / एप्रिल, २०२४ च्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचे डी.टी.पी., टाईप सेटिंग, प्रुफ रिडींग करुन वेळापत्रकानुसार प्रश्नपत्रिका ऑनलाईन ई-मोड (SRQPD) प्रणालिद्वारे गोपनीय पध्दतीने परीक्षाकेंद्रावर पाठविण्याच्या कामासाठी SHPC Technologies Pvt. Ltd, Mumbai या गोपनीय फर्मकडून करुन घेण्याकरिता वर्क ऑर्डर देण्यात आल्याची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.**

**तसेच सदर फर्मच्या देयकासंदर्भात सत्यता पडताळणी करण्यासाठी खालीलप्रमाणे त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात येऊन समितीच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी असे ही सर्वानुमते ठरले.**

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | **डॉ. समाधान दिगंबर पवार** | **अध्यक्ष** |
| २. | **श्री. सचिन मारुती गायकवाड** | **सदस्य** |
| ३. | **डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ** | **सचिव** |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **विद्यापीठासाठी नवीन संकेतस्थळ तयार करण्यासाठी pahsus.edu.in या नावाने नवीन Domain खरेदी करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ व EDULAB Educational Exchange Pvt. Ltd. या सॉफ्टवेअर कंपनीमध्ये करार करण्यात आलेला आहे. यासाठी pahsus.edu.in या नावाने नवीन Domain घेणे गरजेचे आहे.<br>या संदर्भात मा. कुलगुरु व संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या सुचनेनुसार सदर Domain हे १० वर्षाकरीता घेण्यासाठी सुचित करण्यात आले आहे. याबाबत चौकशी केली असता, सदरचे Domain हे भारत सरकारच्या ERNET India यांच्यामार्फत घेणे आवश्यक आहे. या कारणाने ERNET India यांच्या संकेतस्थळावर चौकशी केली असता, सदरचे Domain १ वर्षासाठीचा खर्च रु.९४४/- इतका व १० वर्षासाठी रु.९,४४०/- इतका खर्च अपेक्षित आहे. याकरिता आवश्यक कागदपत्रांची व हमीपत्र नमुन्याची प्रत सोबत जोडली आहे.<br>१) उपरोक्तप्रमाणे pahsus.edu.in या नावाने १० वर्षासाठी Domain विकत घेण्यासाठी मान्यता असावी.<br>२) Domain खरेदी करण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र व रु.१००/- च्या बॉन्ड वरती हमीपत्र देण्यास मान्यता असावी.<br>३) यासाठी अंदाजित रक्कम रु.९,४४०/- इतका खर्च अपेक्षित असून सदरची १००/- रक्कम अग्रीम (Advance) ERNET India या कंपनीस online रित्या अदा करण्यास मान्यता असावी.<br>४) सदरचा खर्च AMC Charges for Hardware & Software या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली खर्ची टाकण्यास मान्यता असावी.<br>सबब, विद्यापीठासाठी नवीन संकेतस्थळ तयार करण्यासाठी pahsus.edu.in या नावाने नवीन Domain खरेदी करण्याची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **विद्यापीठासाठी नवीन संकेतस्थळ तयार करण्यासाठी pahsus.edu.in या नावाने २० वर्षासाठी नवीन Domain खरेदी करण्यास, त्यासाठी येणाऱ्या खर्चास व इतर अनुषंगिक बाबीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०५ ] | **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलातंर्गत विविध विषयातील कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार गठीत करण्यात येणाऱ्या स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेल्या प्राचार्य किंवा प्राध्यापक यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रस्तुत विद्यापीठ परिसर सर्व संकुलामधील नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभारासाठी स्थानिक निवड समितीमार्फत तात्पुरती कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरावयाची आहेत.<br>सदर पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार गठीत करण्यात येणाऱ्या स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला प्राचार्य किंवा प्राध्यापक यांचे नामनिर्देशनाची तरतूद आहे.<br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलातंर्गत विविध विषयातील कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार गठीत करण्यात येणाऱ्या स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेल्या प्राचार्य किंवा प्राध्यापक यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलातंर्गत विविध विषयातील कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार गठीत करण्यात येणाऱ्या स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेल्या प्राचार्य किंवा प्राध्यापक यांचेमधून डॉ. समाधान दिगंबर पवार यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०६] | **विद्यापीठ व महाविद्यालये न्यायाधिकरणाच्या मा. पीठासीन अधिकाऱ्यांच्या झालेल्या खर्चाबाबत मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे दि.१९/१२/२०२३ रोजीचे पत्र विचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ८०(७) च्या तरतुदीस अनुसरुन विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणाच्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या होणाऱ्या खर्चाबाबत महाराष्ट्राचे राज्यपाल महोदयांनी आदेश पारीत करुन त्याद्वारे पीठासीन अधिकाऱ्यास व त्याच्या दिमतीला असलेल्या कर्मचारी वर्गास अनुज्ञेय असलेले परिश्रमिक, निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी, अंशदान, रजा भत्ता आणि इतर भत्ते व सोयी यासाठी होणारे सर्व खर्च हा विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरणाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या विद्यापीठांनी त्यांच्याशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांच्या संख्येच्या प्रमाणात करावा असे नमूद असल्याचे वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी दि.१९/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.<br>तसेच सदर पत्रान्वये वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी दि.०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२३ या आर्थिक वर्ष कालावधीतील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून झालेल्या खर्चाचा खालीलप्रमाणे तपशिल सादर केलेला आहे.<br><table><tr><th>अ.क्र.</th><th>वर्ष</th><th>विभागाचे नाव</th><th>खर्च</th></tr><tr><td>१)</td><td>२०१८-२०२२</td><td>स्थावर विभाग (सा. फु. पु. विद्यापीठ)</td><td>१,६०,३९७/- (जीएसटीसह)</td></tr><tr><td>२)</td><td>२०१८-२०२३</td><td>वेतन कक्ष</td><td>३,०३,०५,६६६/-</td></tr><tr><td>३)</td><td>२०१८-२०२३</td><td>वेतना व्यतिरिक्त</td><td>३७,८२,९४९/-</td></tr><tr><td colspan="3">एकुण :</td><td>३,५०,४९,०१२/-</td></tr></table><br>तसेच वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी उक्त नमूद पत्रान्वये तपशिलानुसार सन २०१८-२०२३ या आर्थिक वर्षात एकुण खर्च रु. ३,५०,४९,०१२/- इतका झाल्याचे, सदरील खर्च सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या तीन विद्यापीठाकडून त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांच्या संख्येंच्या प्रमाणात खर्च करावयाचा असल्याने सन २०१८ ते | आस्थापना विभाग |

| | | |
|---|---|---|
| | २०२३ पर्यंत झालेल्या खर्चाच्या विद्यापीठनिहाय हिस्सा खालीलप्रमाणे असल्याचे कळवून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या हिश्याची रक्कम Finance & Account Officer, SPPU या नावे धनादेशाद्वारे अथवा RTGS/NEFT करुन UTR क्रमांक पत्राद्वारे कळविणेबाबत विनंती केलेली आहे. | |

| अ. क्र. | विद्यापीठाचे नाव | संलग्नित महाविद्यालयांची संख्या | हिश्याची रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | ७७८ | २,३३,६६,००८/- |
| २) | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २८५ | ८५,५९,५२७/- |
| ३) | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | १०४ | ३१,२३,४७७/- |

वास्तविक पाहता, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यानी दि.२३/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये महाविद्यालय व विद्यापीठीय न्यायाधिकरणास सहा. कुलसचिव व वाहनचालक हे दोन्ही पदांच्या वेतनापोटी रक्कम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडे जमा करणेबाबत कळविले होते. सदर बाबतचा विषय दि.१६/०७/२०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करण्यात आला असता व्यवस्थापन परिषदेने कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी दि.२३/०५/२०१९ रोजीच्या पत्राची नोंद घेण्यात आली असे ठराव पारीत केलेला आहे. त्यामुळे कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या दि.२३/०५/२०१९ रोजीच्या पत्रानुसार कार्यवाही होऊ शकलेली नाही.

सबब, विद्यापीठ व महाविद्यालये न्यायाधिकरणाच्या मा. पीठासीन अधिकाऱ्यांच्या झालेल्या खर्चाबाबत मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे दि.१९/१२/२०२३ रोजीचे पत्र विचारार्थ.

| | | |
|---|---|---|
| ठराव: | **विद्यापीठ व महाविद्यालये न्यायाधिकरणाच्या मा. पीठासीन अधिकाऱ्यांच्या झालेल्या खर्चाबाबत मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे दि.१९/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली विद्यापीठाच्या हिश्याची रक्कम ₹३१,२३,४७७/- (अक्षरी रुपये एकतीस लाख तेवीस हजार चारशे सत्याहत्तर फक्त) देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | **ICAR-Indian Institute of Millets Research व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराचा (MoU) मसुदा व करार करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: ICAR-Indian Institute of Millets Research व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराच्या (MoU) मसूद्यास मान्यता देण्याकरिता उपरोक्त संदर्भान्वये सदरचा विषय दि.१९/०४/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीत ठराव क्र.७(१) अन्वये सादर करण्यात आलेला होता.<br>व्यवस्थापन परिषदेने ICAR-Indian Institute of Millets Research व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराच्या मसुद्यामध्ये दुरुस्त्या करुन सदरचा विषय पुनश्च: सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.<br>व्यवस्थापन परिषदेने सुचविल्याप्रमाणे सामंजस्य कराराच्या (MoU) चा मसुद्यातील सर्व दुरुस्त्या करुन पुन्हा MoU Cell च्या दि.२७/०५/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये सादर केलेला होता. MoU Cell च्या तपासणीनंतर सदर MoU Cell च्या बैठकीत केलेल्या दुरुस्तीप्रमाणे सदरचा विषय पुनश्च: सादर करण्याची बाब विचारार्थ. | जैवविज्ञान संकुल |
| ठराव: | **ICAR-Indian Institute of Millets Research व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराचा (MoU) मसुद्यास व करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०८ ] | **Seema Biotech Pvt. Ltd, Solapur व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराचा मसुदा व करार करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: Seema Biotech Pvt. Ltd, Solapur व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराच्या (MoU) मसूद्यास मान्यता देण्याकरिता उपरोक्त संदर्भान्वये सदरचा विषय दि.१९/०४/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषद ठराव क्र. ७(१) अन्वये सादर करण्यात आलेला होता.<br>व्यवस्थापन परिषदेने Seema Biotech Pvt. Ltd, Solapur पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराच्या (MoU) मसुद्यामध्ये दुरुस्त्या करुन सदरचा विषय पुनश्च: सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.<br>सबब, व्यवस्थापन परिषदेने सुचविल्याप्रमाणे सामंजस्य कराराच्या (MoU) मसुद्यातील सर्व दुरुस्त्या करुन पुन्हा MoU Cell च्या दि.२७/०५/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये सादर केलेला होता. MoU Cell च्या तपसणीनंतर सदर MoU Cell च्या बैठकीत केलेल्या दुरुस्तीप्रमाणे सदरचा विषय पुनश्च: सादर करण्याची बाब विचारार्थ. | जैवविज्ञान संकुल |
| ठराव: | **Seema Biotech Pvt. Ltd, Solapur व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराच्या मसुद्यास व करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०९ ] | **प्रस्तुत विद्यापीठातील आरोग्य विज्ञान संकुलास विवेकानंद केंद्र शाखा सोलापूर या संस्थेशी शैक्षणिक सहचर्य करार करुन कौशल्याधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: अखिल भारतीय स्तरावर कार्य करणाऱ्या विवेकानंद केंद्र या सेवाभावी संस्थेने सोलापूर शाखेच्या अंतर्गत सोलापूर शहरात वेदांतिक एप्लिकेशन ऑफ योग एंड मॅनेजमेंट (व्ही के वयम) हे योग विषयामध्ये प्रशिक्षण व संशोधन करणारे केंद्र स्थापन केलेले असून सदर केंद्राच्या माध्यमातून स्थानिक समाजातील वेगवेगळ्या घटकांसाठी योग विषयक विविध उपक्रम राबवले जातात. सदर संस्था प्रस्तुत विद्यापीठातील आरोग्य विज्ञान संकुलासोबत शैक्षणिक सहयर्च करुन योग विषयातील दोन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करु इच्छित आहे. सदर दोन्ही अभ्यासक्रमांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत.<br><table><tr><td>अ. क्र.</td><td>अभ्यासक्रमाचे नाव</td><td>कालावधी</td><td>प्रवेश पात्रता</td><td>शुल्क</td></tr><tr><td>१</td><td>Certificate Course in Patanjal Yog Darshan</td><td>१ वर्ष विकेंड</td><td>१२ वी पास</td><td>रु.३,०००</td></tr><tr><td>२</td><td>Certificate Course in Foundation of Yoga</td><td>३ महिने</td><td>१२ वी पास</td><td>रु.२,०००</td></tr></table>वरील दोन्ही अभ्यासक्रम या आधी विद्यापीठात शिकवले जात नसून त्यांचे स्वरुप प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे असल्याने प्रस्तुत विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्राच्या यादीत या अभ्यासक्रमांचा समावेश करुन आरोग्य विज्ञान संकुल व सदर संस्था यांच्या मध्ये शैक्षणिक सहचर्य करार करुन सदर अभ्याक्रम सुरु करता येतील. तसेच सदर संस्था व आरोग्य विज्ञान संकुल यांच्या मध्ये संयुक्त विद्यमाने योग विषयात संशोधन पर प्रकल्प राबवता येवू शकतील त्याचप्रमाणे विद्यापीठातील एम. ए. योगा अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना सदर संस्थेत ऑन जॉब ट्रेनिंग करता पाठवता येवू शकेल.<br>सबब, वरील सर्व बाबी लक्षात घेता उपरोक्त यादीतील अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी विवेकानंद केंद्र सोलापूर यांच्याशी शैक्षणिक सहचर्य करार करण्याची बाब विचारार्थ. | आरोग्य केंद्र |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठातील आरोग्य विज्ञान संकुलास विवेकानंद केंद्र, शाखा सोलापूर या संस्थेशी शैक्षणिक सहचर्य करार करुन कौशल्याधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **विद्यापीठ आरोग्य केंद्रासाठी पेशंट ट्रान्सपोर्ट (लेव्हल १) रुग्णवाहिका घेण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ आरोग्य केंद्र विद्यापीठाच्या दहा एकर परिसरात स्थलांतर झाले असून, येणाऱ्या वर्षात विद्यापीठाचे मुख्य कार्यालय, परीक्षा विभाग, मुलांचे वसतिगृह, क्रीडा संकुल इत्यादी इमारती विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात स्थलांतरित होणार आहेत. अशा वेळी ज्या विद्यार्थ्यांना अथवा कर्मचाऱ्यांना तातडीच्या वैद्यकीय सेवेची आवश्यकता लागणार असेल त्यांना आरोग्यकेंद्रात आणण्यासाठी तसेच आवश्यकतेनुसार शहरातील रुग्णालयात दाखल करण्यासाठी आरोग्य केंद्राकडे पेशंट ट्रान्सपोर्ट (लेव्हल १) रुग्णवाहिका असणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठात वेळोवेळी होत असलेले पदवीदान समारंभ, वर्धापन दिन, नामविस्तार दिन, आव्हान, अविष्कार, उत्कर्ष तसेच इतर विद्यापीठस्तरीय अथवा राज्यस्तरीय स्पर्धाअथवा कार्यक्रमांच्या वेळी आपात्कालीन व्यवस्थेचा भाग म्हणून खाजगी रुग्णवाहिका भाड्याने मागवावी लागते. काहीवेळा रुग्णवाहिका भाड्याने मिळणे देखील अवघड बनते किंवा त्याकरीता अतिरिक्त भाडे भरावे लागते. या सर्व बाबींचा विचार करता विद्यापीठ आरोग्य केंद्राकडे स्वत:ची रुग्णवाहिका असणे आवश्यक आहे. याबाबत सोलापूर शहरातील मोटर डिलर्स यांच्याकडे रुग्णवाहिकांची चौकशी केली असता, मारुती ओम्नी रुग्णवाहिका बंद झाल्याचे कळले तसेच महिंद्र कंपनीकडे बोलेरो निओ या नावाने रुग्णवाहिका उपलब्ध असून त्याची किंमत जवळपास साडे पंधरा लाख इतकी आहे. विद्यापीठाकडे चालू आर्थिक वर्षात वाहन खरेदी या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली रु.५० लाख इतकी तरतूद आहे.<br>सबब, रुग्णवाहिकेची आवश्यकता व त्याची किंमत पाहता सदर रुग्णवाहिका खरेदी करण्याबाबतचा निर्णय धोरणात्मक असल्याने सदरची बाब विचारार्थ. | आरोग्य केंद्र |
| ठराव: | **विद्यापीठ आरोग्य केंद्रासाठी पेशंट ट्रान्सपोर्ट (लेव्हल १) रुग्णवाहिका खरेदीसाठी विविध कंपन्यांच्या CSR फंडातून घेण्यासाठी साधारणपणे वर्षभर प्रयत्न करणे व त्यासाठी येणारा खर्च करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तथापि, CSR फंडातून जर रुग्णवाहिका खरेदी करता येत नसल्यास विद्यापीठ फंडातून खरेदी करण्याची प्रक्रिया करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ११ ] | **अधिसभा सदस्या ॲड. सुनंदा करण भगत यांनी ठराव क्र.२४ नुसार पाठविलेल्या सुचनेच्या अनुषंगाने दि.२८/०२/२०२४ रोजीच्या अधिसभा बैठकीत व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या दि.२८/०२/२०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीमध्ये अधिसभा सदस्य, ॲड. सुनंदा करण भगत यांनी खालीलप्रमाणे सुचना पाठविली होती.<br>"विद्यापीठामध्ये कायदा अधिकारी असूनही विद्यापीठाच्या विविध केसेसच्या संदर्भात बाहेरील वकीलामार्फत सल्ला मागवला जातो व त्यावर नाहक विद्यापीठाचा पैसा खर्च होतो, त्यामुळे असे न करता यापुढे कायदा अधिकारी यांच्याकडूनच सल्ला घ्यावा, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे. त्यावर अधिसभेमध्ये चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव पारित झालेला आहे."<br>ठराव: सदरचा प्रस्ताव ॲड. सुनंदा करण भगत यांच्या वतीने श्रीमती वर्षाराणी गिरीष कामुर्ती यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>सबब, अधिसभा सदस्य, ॲड. सुनंदा करण भगत यांनी ठराव क्र.२४ नुसार पाठविलेल्या सुचनेच्या अनुषंगाने दि.२८/०२/२०२४ रोजीच्या अधिसभा बैठकीत व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ. | कायदा विभाग |
| ठराव: | **अधिसभा सदस्या ॲड. सुनंदा करण भगत यांनी ठराव क्र.२४ नुसार पाठविलेल्या सुचनेच्या अनुषंगाने दि.२८/०२/२०२४ रोजीच्या अधिसभा बैठकीत व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारात घेता, सर्वसाधारणपणे विद्यापीठ कायदा अधिकारी यांचेकडून सल्ला घेण्यात यावा, मात्र आवश्यकतेनुसार त्या त्या परिस्थितीत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा.कुलगुरु महोदय यांना सर्वानुमते देण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागाकडील आणि विद्यापीठाच्या इतर सर्व विभागांसाठी Supply Installation and Commisioning of Automated Answersheet / Document Repository System with document management software कामासाठी रुपये ४,५७,२५,०००/- (अक्षरी रुपये चार कोटी सत्तावन लाख पंचवीस हजार फक्त) चे अंदाजपत्रकास अनुसरुन प्रशासकीय मान्यतेस्तव विचारार्थ व त्या अनुषंगाने E-Tender प्रक्रिया परीक्षा विभागामार्फत करण्यास विचारार्थ.<br>टिपणी: परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागाकडील आणि विद्यापीठाच्या इतर सर्व विभागांसाठी Supply Installation and Commisioning of Automated Answersheet / Document Repository System with document management software कामासाठी रुपये ४,५७,२५,०००/- (रुपये चार कोटी सत्तावन लाख पंचवीस हजार फक्त) चे अंदाजपत्रक Tech-Mark Automation & Controls यांनी सादर केलेले आहे.<br>सबब, परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागाकडील आणि विद्यापीठाच्या इतर सर्व विभागांसाठी Supply Installation and Commisioning of Automated Answersheet / Document Repository System with document management software कामासाठी रुपये ४,५७,२५,०००/- (अक्षरी रुपये चार कोटी सत्तावन लाख पंचवीस हजार फक्त) चे अंदाजपत्रकास अनुसरुन प्रशासकीय मान्यतेस्तव विचारार्थ व त्या अनुषंगाने E-Tender प्रक्रिया परीक्षा विभागामार्फत करण्यास विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | सदर विषयासंदर्भात सखोल अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे समिति गठीत करण्यात आली. सदर समितीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या विद्यापीठास भेट देऊन सविस्तर अहवाल सादर करावा. | |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु | अध्यक्ष |
| २. | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य |
| ३. | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य |
| ४. | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य |
| ५. | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य |

सदर समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सादर करण्यात येऊन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १३ ] | **मा राज्यपाल यांच्या उपस्थितीत राजभवन मुंबई येथे सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्यासाठी लागणाऱ्या एकूण खर्चाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: दि.२० जून, २०२४ रोजी राजभवन मुंबई येथे मा राज्यपाल यांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्याबाबत राजभवन येथील श्री. विकास कुलकर्णी under Secretary यांनी दूरध्वनीद्वारे डॉ केदारनाथ काळवणे यांना सुचित केले होते. तरी राजभवन येथे झालेल्या चर्चेनुसार पश्चीम बंगाल या राज्याचे दोन लोकनृत्य व लोकगीताचे सादरीकरण तसेच पश्चिम बंगाल या राज्याविषयीचा माहितीपट तयार करून त्याचे सादरीकरण करण्याबाबत सुचविण्यात आले आहे. तरी दोन नृत्यासाठी २० विद्यार्थी, ६ वादक, लोकगीतासाठी ६ विद्यार्थी, ४ वादक, ०३ प्रशिक्षक, ०१ सहायक अशा एकुण ४० व्यक्तीसह १० दिवसाच्या निवासी सराव शिबीराचे आयोजन करुन दोन नृत्य व एक लोकगीत व माहितीपटाचे सादरीकरणाची तयारी करणे आवश्यक आहे तरी उपरोक्त तिन्ही बाबीसाठी खालीलप्रमाणे विविध खर्च अपेक्षित आहे. | विद्यार्थी विकास विभाग |

| अ क्र | खर्चाचा तपशिल | शिबिराचे एकुण दिवस | अपेक्षित एकुण खर्च |
|---|---|---|---|
| १ | लोकनृत्य प्रशिक्षण मानधन | निवासी सराव शिबराचे १५ दिवस व प्रत्यक्ष सादरी करणाचा १ दिवस असे एकुण १६ दिवस | १८,०००/- |
| २ | लोकनृत्य प्रशिक्षण मानधन | | १८,०००/- |
| ३ | लोकनृत्य वादक | | १०,०००/- |
| ४ | लोकनृत्य वादक | | १०,०००/- |
| ५ | लोकगीत प्रशिक्षण मानधन | | १५,०००/- |
| ६ | लोकगीत वादक मानधन | | ५,०००/- |
| ७ | लोकगीत वादक मानधन | | ५,०००/- |
| ८ | लोकगीत वादक मानधन | | ५,०००/- |
| ९ | एकुण ३७ व्यक्तीच्या भोजनाचा खर्च | प्रति विद्यार्थी एक वेळ नाष्टा दोन वेळ जेवण साठी रु.२००/- प्रति विद्यार्थी प्रमाणे २०० X ३७ = ७४००/- प्रति दिन प्रमाणे १५ दिवसाचे | ६६,६००/- |
| १० | सोलापूर ते मंबई व परतीचा प्रवास खर्च | प्रति विद्यार्थी रु २२००/- प्रमाणे एकुण ३७ व्यक्तीच्या बसचा प्रवास खर्च | ८१,४००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ११ | लोकनृत्य वेशभुषा मेकप खर्च | दोन नृत्य वेगवेगळे आसणार आहेत | ८,०००/- | |
| | १२ | लोकनृत्य वेशभुषा मेकप खर्च | | ८,०००/- | |
| | १३ | प्रवासा दरम्यान इतर खर्चासाठी | चहापाण व नाष्टा | ५,०००/- | |
| | १४ | माहितीपट तयार करणे | व्हीडीओ रेकार्डींग तयार करणे मानधन | १०,०००/- | |
| | १६ | लोकगीत सादरीकरण वेशभुषा | वेशभूषा खरेदी खर्च | १०,०००/- | |
| | | एकूण | | २,७५,०००/- | |
| | तरी मा. राजभवन यांच्या सुचना व तारखेनुसार सांस्कृतिक काय्रक्रमाचे आयोजन करण्याची व त्यासाठी लागणाऱ्या एकूण रु.२,७५,०००/- इतक्या खर्चाची तरतूद करण्याची बाब विचारार्थ. | | | | |
| ठराव: | **मा. राज्यपाल महोदय यांच्या उपस्थितीत राजभवन, मुंबई येथे होणारा सांस्कृतिक कार्यक्रम रद्द झाल्याने सदर कार्यक्रमाच्या तयारीच्या अनुषंगाने झालेल्या प्रत्यक्ष खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच सदर खर्चाचा तपशील व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सादर करावा असे ठरले.** | | | | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ १४ ] | **प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठाने सादर केलेला Component-१ (Multi-disciplinary Education and Research Universities) प्रस्तावानुसार कामकाज योग्य व जलद गतीने होण्यासाठी २ (दोन) सिव्हील इंजिनिअर आणि १ (एक) बांधकाम सल्लागार कंत्राटी पध्दतीने नेमण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठाने सादर केलेला Component-१ (Multi-disciplinary Education and Research Universities) प्रस्ताव विद्यापीठास मंजूर झालेला आहे.<br>सदर प्रस्तावानुसार New Constructions, Renovation / Up-gradation, Equipments आणि Soft Component अंतर्गत विविध कामकाज करण्यात येणार आहे. दि.०८/०५/२०२४ रोजीच्या पी.एम.यु. बैठकीतील ठराव क्र. २ नुसार इंजिनिअर व सल्लागार कंत्राटी पदधतीने नेमण्यास ठराव पारीत झाला आहे.<br>या अनुषंगाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठाने सादर केलेला Component-१ (Multi-disciplinary Education and Research Universities) प्रस्तावानुसार कामकाज योग्य व जलद गतीने होण्यासाठी २ (दोन) सिव्हील इंजिनिअर आणि १ (एक) बांधकाम सल्लागार कंत्राटी पध्दतीने नेमण्याची बाब विचारार्थ. | पी.एम. उषा विभाग |
| ठराव: | **प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठाने सादर केलेला Component-१ (Multi-disciplinary Education and Research Universities) प्रस्तावानुसार कामकाज योग्य व जलद गतीने होण्यासाठी १ (एक) सिव्हील इंजिनिअर कंत्राटी पध्दतीने रु.५०,०००/- च्या आत एकत्रित मानधनावर थेट नेमण्यास मा.कुलगुरु महोदयांना सर्वाधिकार देण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १५ ] | **डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर, अधिसभा सदस्य यांनी दि.२८/०२/२०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत सादर केलेल्या ठराव क्र.१६ नुसार मांडलेला ठराव विचारार्थ.**<br>टिपणी: डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर, अधिसभा सदस्य यांनी दि.२८/०२/२०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत ठराव क्र.१६ नुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव / ठराव सादर केलेला होता.<br>"विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळावर / समित्यावर काम करणाऱ्या सदस्यांना / तज्ञांना दिला जाणाऱ्या प्रवास खर्चापोटी प्रति की.मी. दर पेट्रोल (हायब्रीड सह) व डिझेल (हायब्रीड सह) / सीएनजी / इलेक्ट्रिकल वाहनासाठी अनुक्रमे रु.१४/- व रु.१२/- असा करण्यात यावा तसेच स्थानिक / दैनिक भत्ता रु.६००/- करण्यात यावा अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."<br>या ठरावावर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.<br>ठराव: सदरचा प्रस्ताव डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. सिध्देश्वर बाबु स्वामी यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>याबाबत सादर करण्यात येते की, सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्य शासनाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रवास व दैनिक भत्त्याच्या दरामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा केलेली आहे. शासन निर्णय संदर्भ क्र.महाराष्ट्र शासन निर्णय, वित्त विभाग क्र. प्रवास-१०१०/प्र.क्र.२/९८/सेवा-५, मंत्रालय, मुंबई दि.०३ मार्च, २०१० निर्गमित करुन त्यानुसार प्रति कि.मी. डिझेल वाहनाकरिता रु.७/- व प्रति कि.मी. पेट्रोल वाहनाकरिता रु.९/- याप्रमाणे सुधारित दर निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सर्व देयके आदा करण्यात येत आहेत. तसेच यापूर्वी दैनिक भत्ता रु.९०/- इतका आदा करण्यात येत होता. त्यामध्ये व्यवस्थापन परिषदेच्या दि.२२/०७/२०१४ रोजी झालेल्या बैठकीतील विषय क्र.६(४) नुसार सोलापूर विद्यापीठाच्या कामासाठी शहरातून (महानगरपालिका हद्द) येणाऱ्या सर्व अधिकारमंडळाचे सन्माननीय सदस्य, शिक्षक, महाविद्यालयीन प्रशासकीय कर्मचारी व प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्थानिक भत्त्याच्या दरात (Local Conveyance Allowance) मध्ये वाढ करुन दि.०१ ऑगस्ट, २०१४ पासून रु.९०/- वरुन रु.१५०/- अशी सुधारणा करण्यात आलेली आहे.<br>व्यवस्थापन परिषदेच्या दि.१६/०७/२०१९ रोजीच्या विषय क्र.२५(१४) वरील ठरावानुसार व्यवस्थापन परिषद सदस्य व अधिष्ठाता यांना विद्यापीठामध्ये कार्यालयीन कामानिमित्त भेटी दिल्यास चारचाकी वाहनाकरिता प्रचलित नियमापेक्षा रु.२/- प्रति कि.मी. वाढीव दराने (डिझेलकरिता रु.७/- ऐवजी रु.९/- व पेट्रोलकरिता रु.९/- ऐवजी रु.११/-) आदा करण्यास मान्यता देण्यात आली तसेच सोलापूर शहरातून येणाऱ्या व्यवस्थापन परिषद सदस्य व अधिष्ठाता यांनाही चारचाकी गाडीसाठी वाहन भाडे प्रचलित नियमापेक्षा रु.२/- प्रति कि.मी. वाढीव दराने आदा करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सुधारित दराने सर्व देयके आदा करण्यात येत आहेत. | वित्त व लेखा विभाग |

यानंतर व्यवस्थापन परिषदेच्या दि.१९/०९/२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील विषय क्र.११(१९) वर झालेल्या ठरावानुसार, परीक्षा विभागातील विविध कामासंदर्भात डी. ए. ऐवजी स्वतंत्र भत्ता व मानधनात वाढ देण्याऐवजी तसेच विद्यापीठातील परीक्षेच्या प्रत्येक कामासाठी व महाविद्यालयातील लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बहिस्थ पर्यवेक्षक व सुट्टीच्या कालावधीतील अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षकाचे काम केल्यास दैनिक /स्थानिक भत्ता रु.१५०/- ऐवजी विशेष भत्ता प्राचार्य / शिक्षक आणि विद्यापीठातील वर्ग १ अधिकारी यांना रु.४००/-, वर्ग २ व वर्ग ३ चे कर्मचारी यांना रु.३००/- व वर्ग ४ चे कर्मचारी यांना रु.२००/- याप्रमाणे आदा करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे दैनिक / स्थानिक भत्ता याऐवजी विशेष भत्ता आदा करण्यात येत आहे.

यानंतर व्यवस्थापन परिषदेच्या दि.१३/१२/२०१९ रोजीच्या झालेल्या बैठकीतील ठराव क्र.१ नुसार दि.१९/०९/२०१९ रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करीत असताना त्यावर पान क्र.५९ वर आयत्या वेळेचा विषय क्र.११(१९) वर खालीलप्रमाणे ठराव दुरुस्त करण्यात आलेला आहे.

पूर्वीचा ठराव

परीक्षा विभागातील विविध कामासंदर्भात डी. ए. ऐवजी स्वतंत्र भत्ता व मानधनात वाढ देण्याबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवाल स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

दुरुस्त केलेला ठराव

परीक्षा विभागातील विविध कामासंदर्भात डी. ए. ऐवजी स्वतंत्र भत्ता व मानधनात वाढ देण्याबाबत गठीत केलेल्या समितीची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच सदर समितीने केलेली शिफारस विद्यापीठाच्या सर्व विभागातील विविध कामासंदर्भात लागू करण्यात यावी असे ही ठरले.

यानुसार सद्यस्थितीत विद्यापीठाच्या सर्व विभागातील विविध कामास उपस्थित राहणाऱ्या सदस्यांना वरीलप्रमाणे विशेष भत्ता आदा करण्यात येत आहे. डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर, अधिसभा सदस्य यांच्या प्रस्तावानुसार प्रवास, स्थानिक / दैनिक भत्ता यामध्ये वाढ करण्याकरिता इतर विद्यापीठांकडून त्याची माहिती घेण्यासाठी दि.१४/०५/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सर्व मा.वित्त व लेखा अधिकारी यांना कळविण्यात आले. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून सदर माहिती प्राप्त झालेली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये डिझेल व सीएनजी वाहनाकरिता प्रति कि.मी. रु.८/- व पेट्रोल वाहनाकरिता प्रति कि.मी. रु.१०/- याप्रमाणे आदा करण्यात येत आहे तसेच पुणे महानगरपालिका / पिंपरी चिंचवड महानगरपालिका / पुणे लष्कर / खडकी लष्कर विभाग तसेच विद्यापीठापासून २५ कि.मी. परीघातील सदस्यांना स्थानिक भत्ता रु.५००/- आदा करण्यात येतो.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर या विद्यापीठामध्ये वित्त विभाग महाराष्ट्र शासन यांच्या दि.०३ मार्च, २०१० नुसार डिझेल वाहनाकरिता प्रति कि.मी. रु.७/- व पेट्रोल वाहनाकरिता प्रति कि.मी. रु.९/- प्रमाणे प्रवास भत्ता आदा करण्यात येतो. स्थानिक व्यवस्थापन परिषद सदस्यांना बैठकीसाठी रु.६००/- वाहन भत्ता आदा करण्यात येतो व इतर सर्व कर्मचाऱ्यांना रु.१५०/- असा आहे.

सध्या प्रस्तुत विद्यापीठामध्ये विविध अधिकारमंडळावर / समित्यांवर काम करणाऱ्या तज्ञांना / सदस्यांना विशेष भत्ता (स्थानिक / दैनिक भत्त्यापोटी) रु.४००/- व पेट्रोल वाहनाकरिता रु.९/- प्रति कि.मी. व डिझेल वाहनाकरिता रु.७/- प्रति कि.मी. याप्रमाणे भत्ता आदा करण्यात येत आहे.

विशेष भत्ता (दैनिक / स्थानिक भत्ता) व प्रवास भत्ता याकरिता सन २०२१-२२, सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे एकूण खर्च झालेला आहे.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | झालेला खर्च |
|---|---|---|
| १) | २०२१-२२ | ४६,६३,०९४/- |
| २) | २०२२-२३ | १,५२,३७,६८२/- |
| ३) | २०२३-२४ | ३,०२,८६,७२२/- |

वरीलप्रमाणे सन २०२१-२२ मध्ये झालेला खर्च हो कोव्हिड-१९ च्या संसर्गामुळे कमी झालेला असून सन २०२२-२३ मध्ये नियमित बैठका व कामकाज सुरु झाल्यामुळे या खर्चामध्ये तिपटीने वाढ झालेली आहे. प्रत्यक्षात आदा केलेल्या प्रवास / विशेष भत्त्यापोटी सन २०२३-२४ मध्ये सन २०२२-२३ च्या तुलनेत जवळपास दुप्पट खर्च झाल्याचे दिसून येते.

मा. अधिसभा सदस्य डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर यांनी प्रस्तावित केलेली वाढ लागू केल्यास साधारणत: खालीलप्रमाणे आर्थिक बोजा विद्यापीठावर पडेल.

| अ. क्र. | प्रत्यक्षात होणारा खर्च (सद्यस्थितीतील दर) | | | प्रस्तावित दरवाढ दिल्यास विद्यापीठावर वाढलेला अतिरिक्त बोजा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | डिझेल / (रु.७/-) | पेट्रोल (रु.९/-) | विशेष भत्ता (रु.४००/-) | डिझेल / सीएनजी / इलेक्ट्रिकल (रु.१२/-) | पेट्रोल (रु.१४/-) | विशेष भत्ता (रु.६००/-) |
| १) | १००% | १००% | १००% | १५५% | १७१% | १५०% |

उक्त तक्त्याप्रमाणे प्रस्तावित वाढ केल्यास डिझेल / सीएनजी / इलेक्ट्रिकल वाहनाच्या प्रति कि.मी. खर्चात ५५%, पेट्रोल वाहनाच्या प्रति कि.मी. खर्चात ७१% व विशेष भत्त्यात ५०% याप्रमाणे एकूण खर्चामध्ये वाढ होवून विद्यापीठावर अतिरिक्त बोजा पडेल.

विद्यापीठास दरवर्षी वार्षिक लेखे अंतिम झाल्यानंतर साधारणपणे रु.३ ते ५ कोटीपर्यंत अतिरिक्त निधी (surplus) राहतो व सदर अतिरिक्त निधीमधून विद्यार्थ्यांसाठी भौतिक सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे यामध्ये नवीन इमारतीचे बांधकाम, नवीन रस्ता करणे, वसतिगृहाचे बांधकाम, सर्व बांधकामाची देखभाल दुरुस्ती, विद्यापीठाचा सर्व प्रशासकीय खर्च (कंत्राटी / प्रशासकीय सेवक यांच्या वेतनाचा खर्च, वीज देयक, इंटरनेट देयक) इ. भागविण्यात येतो. तथापि, वरीलप्रमाणे वाढ केल्यास एकूण खर्चामध्ये वाढ होवून प्रत्यक्षात विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता निधी अपुरा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सबब, डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर, अधिसभा सदस्य यांनी व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थितीसह विचारार्थ.

ठराव: **डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर, अधिसभा सदस्य यांनी दि.२८/०२/२०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत सादर केलेल्या ठराव क्र.१६ अधिसभेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १६ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०२ अन्वये गठीत निवड समितीमधील कलम १०२ (२) (छ) नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला प्राचार्य यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१६६-अ/१७/विशि-१, दि.१६ नोव्हेंबर, २०२२ नुसार प्रस्तुत विद्यापीठास रिक्त शिक्षक संवर्गापैकी सात (०७) शिक्षक पद भरतीस मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तर सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी २०२४/प्र.क्र. ७५/१६-क, दि.२७ फेब्रुवारी, २०२४ नव्याने सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार (मराठा आरक्षण) सुधारित बिंदुनामावली विहित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या शिक्षक संवर्गातील बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, पुणे यांचेकडून करुन घेण्यात आली आहे. तद्नंतर मा. प्रधान सचिव, १६-ब, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे बिंदुनामावली नोंदवही अंतिम तपासणीसाठी विहित मार्गाने सादर करण्यात आली आहे. अंतिम तपासणी अहवालाअंती सदर सात (०७) शिक्षकीय पद भरती सत्वर सुरु करण्यात येणार आहे.<br>सदर पदभरतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ नुसार निवड समिती गठीत करावी लागणार असून, निवड समितीतील १०२ (२) (छ) नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावायाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक प्राचार्य यांचे नामनिर्देशनाची तरतूद आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (२) (छ) अन्वये व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक प्राचार्य यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०२ अन्वये गठीत निवड समितीमधील कलम १०२ (२) (छ) नुसार, व्यवस्थापन परिषदेमध्ये प्राचार्य संवर्गातील पद रिक्त असल्याने व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला प्राचार्य यांचे नामनिर्देशन निरंक ठेवण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १७ ] | **विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (University Grants Commission) Guidelines for Empanelment for Adjunt Faculty in Universities and Colleges मधील मार्गदर्शक सूचनेनुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या रसायनशास्त्र संकुलात Adjunct Professor म्हणून डॉ. प्रकाश पी. वडगांवकर यांची एकत्रित मानधनावर नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: डॉ. ए. ए. घनवट, सहयोगी प्राध्यापक, रसायनशास्त्र संकुल यांनी दि.०१/०४/२०२४ रोजी संबंधित संकुलाच्या संचालकांमार्फत मा. कुलसचिवांच्या नावे अर्ज पाठवून विनंती केली आहे की, डॉ. प्रकाश पी. वडगांवकर हे CSIR-National Chemical Laboratory, Pune येथे Emertis Scientist म्हणून Polymer Science and Engineering विभागात कार्यरत होते. डॉ. वडगांवकर यांच्या अधिपत्याखाली एकूण २४ विद्यार्थ्यांनी Ph.D. ही पदवी प्राप्त केली आहे. त्यांचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील २३ पेटंट्स आहेत. तर २२० संशोधन पेपर Peer reviewed journals मध्ये प्रकाशित झाले आहेत. त्यांना रसायनशास्त्र संकुलात Adjunct Professor म्हणून नेमल्यास संकुलातील अध्ययन करत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवाचा व संशोधनाचा फायदा मिळणार आहे असे कळविले आहे. याबाबत प्रस्तुत कार्यालयाकडून दि.०५/०४/२०२४ रोजी सादरीकरण केले असता, सदर सादरीकरणावर डॉ. प्रकाश पी. वडगांवकर यांच्या अर्जाची छाननी करणेकामी मा.कुलगुरु महोदयांनी खालीलप्रमाणे समिती गठीत केली आहे. | आस्थापना विभाग |

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत दामा,<br>प्र-कुलगुरु, पुअहोसोविसो | अध्यक्ष |
| २) | डॉ. ए. ए. घनवट,<br>सहयोगी प्राध्यापक, रसायनशास्त्र संकुल, पुअहोसोविसो | सदस्य |
| ३) | डॉ. प्रशांत पवार,<br>प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, पुअहोसोविसो | सदस्य |
| ४) | प्रा. आर. एन. जगताप,<br>Indian Chemical Technology, मुंबई | सदस्य |
| ५) | श्रीमती योगिनी घारे,<br>कुलसचिव, पुअहोसोविसो | संयोजक (Convenor) |

सदर समितीची बैठक दि.०६/०६/२०२४ रोजी दु.१:०० वा. राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब व्यवस्थापन परिषद कक्षात संपन्न झाली. समितीने सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित केले आहेत.

१) डॉ. प्रकाश पी. वडगांवकर यांच्या Adjunct Professor म्हणून नेमणूकीसाठी प्राप्त अर्जाची सर्वंकष छाननी करुन, त्यांच्या राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय संशोधनाची नोंद घेऊन डॉ. प्रकाश पी. वडगांवकर यांची प्रस्तुत विद्यापीठाच्या रसायनशास्त्र संकुलात Adjunct Professor म्हणून नेमणूक करण्यास ही समिती आग्रहाची शिफारस (Strongly Recommended) करत आहे.

२) समितीतील अध्यक्ष व सदस्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेतील Adjunct Professor साठी माहे मानधन आणि शिवाजी विद्यापीठाने Adjunct Professor साठी ठरविलेले मानधन यावर सर्वकष चर्चा करुन प्रस्तुत विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलासाठी नेमण्यात येणारे Adjunct Professor डॉ. प्रकाश पी. वडगांवकर यांना माहे रु.५०,०००/- एकत्रित मानधन आणि त्यांना प्रवास खर्चासाठी एकावेळी जास्तीत जास्त (Maximum) रु.३,०००/- अनुज्ञेय करण्याची शिफारस समितीने केली. तसेच सदर Adjunct Professor महिन्यातून किमान दोन वेळा कमीत कमी एकावेळी दोन दिवसांकरिता संबंधित संकुलात उपस्थित राहणे बंधनकारक असेल अशीही शिफारस केली.

सबब, उपरोक्त गठीत समितीने पारित केलेल्या ठरावाप्रमाणे शिफारस केल्यानुसार डॉ. प्रकाश पी. वडगांवकर यांना रसायनशास्त्र संकुलात Adjunct Professor म्हणून माहे रु.५०,०००/- एकत्रित मानधन आणि त्यांना प्रवास खर्चासाठी एकावेळी जास्तीत जास्त (Maximum) रु.३,०००/- वर नेमण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (University Grants Commission) Guidelines for Empanelment for Adjunt Faculty in Universities and Colleges मधील मार्गदर्शक सूचनेनुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या रसायनशास्त्र संकुलात डॉ. प्रकाश पी. वडगांवकर यांची Adjunct Professor म्हणून महिन्यातून किमान दोन वेळा कमीत कमी एकावेळी दोन दिवसांकरिता संबंधित संकुलात उपस्थित राहण्याच्या अटीवर प्रती माह रु.५०,०००/- एकत्रित मानधनावर नियुक्ती करण्यास व प्रवास खर्चासाठी रु.३,०००/- देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१८] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापन दिनी प्रदान करण्यात येणाऱ्या विविध पुरस्काराबाबतची नियमावली सुधारित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल विचारार्थ.**<br>टिपणी: दरवर्षी प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दि.०१ ऑगस्ट रोजी विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात. सदरील पुरस्करामध्ये जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट संस्था, उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट प्राचार्य, उत्कृष्ट शिक्षक (महाविद्यालय व विद्यापीठ) आणि उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी (महाविद्यालय व विद्यापीठ) या पुरस्कारांचा समावेश होता.<br>दि.२४ जुलै, २०२३ रोजी आयोजित व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.०७ (०९) प्रमाणे वर्धापन दिन विविध पुरस्काराबाबतची नियमावली सुधारित करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती. सदरील समितीवर डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांचे अध्यक्ष म्हणून नामनिर्देशन करण्यात आले होते.<br>तथापि, कै. डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांचे दि. १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाल्याने दि.२५ ऑक्टोबर, २०२३ रोजी आयोजित व्यवस्थापन परिषदेतील विषय क्र.०६ च्या ठरावानुसार सदरील समितीवर प्राचार्य डॉ. निवृत्ती पवार यांचे अध्यक्ष म्हणून नामनिर्देशन झाले होते. तथापि, प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबूराव पवार हे नियत वयोमानानुसार दि. ३१ मे २०२४ रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या ऐवजी प्रा. लक्ष्मीकांत ब. दामा यांची समितीवर अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.<br><br>१) प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब. दामा — अध्यक्ष<br>२) डॉ. वसंत गुरुशांत कोरे — सदस्य<br>३) डॉ. समाधान दिगंबर पवार — सदस्य<br>४) डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड — सदस्य<br>५) योगिनी घारे — सदस्य सचिव<br><br>उपरोक्तप्रमाणे समितीची पहिली बैठक दि.१६/०४/२०२४ रोजी आणि दि.१०/०६/२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठकीत पुरस्कार नियमावली संदर्भात अभ्यास व चिंतन करुन विद्यापीठ वर्धापन दिन विविध पुरस्कार नियमावली सुधारित करण्यात आली असून सदर पुरस्कार खालीलप्रमाणे आहेत: | आस्थापना विभाग |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३) | उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार | १. सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ<br>२. रोख रक्कम रु.५,०००/- | |
| | ४) | उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार | १. सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ<br>२. रोख रक्कम रु.५,०००/- | |
| | ५) | उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (विद्यापीठ) | १. सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ<br>२. रोख रक्कम रु.५,०००/- | |
| | ६) | उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (महाविद्यालय) | १. सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ<br>२. रोख रक्कम रु.५,०००/- | |
| | ७) | उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार - वर्ग १ व २ (विद्यापीठ) | १. सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ<br>२. रोख रक्कम रु.५,०००/- | |
| | ८) | उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार - वर्ग ३ (विद्यापीठ) | १. सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ<br>२. रोख रक्कम रु.५,०००/- | |
| | ९) | उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार - वर्ग ४ (विद्यापीठ) | १. सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ<br>२. रोख रक्कम रु.५,०००/- | |
| | १०) | उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार - लिपिक संवर्गीय (महाविद्यालय) | १. सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ<br>२. रोख रक्कम रु.५,०००/- | |
| | ११) | उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार - चतुर्थ श्रेणी (महाविद्यालय) | १. सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ<br>२. रोख रक्कम रु.५,०००/- | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १९ ] | **बी. व्होक., एम. एस्सी. (नॅनोटेक्नॉलॉजी), एम. एस्सी. (इंटरप्रिनरशिप) व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाबाबतचे इतर शुल्क निश्चिती बाबत अधिष्ठाता मंडळ व शुल्क समितीने केलेली शिफारस विद्या परिषदेने स्वीकारुन सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणाऱ्या वार्षिक संलग्निकरण व संलग्निकरणाबाबतच्या इतर शुल्काबाबत.<br>प्रस्तुत विद्यापीठामार्फत एम. एस्सी. (प्रति विषय) रु. २०००/- इतके वार्षिक संलग्निकरण शुल्क असून एम. एस्सी. (बायो-टेक्नॉलॉजी) व एम. एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) या अभ्यासक्रमास प्रत्येकी रु. १५०००/- इतके वार्षिक संलग्निकरण शुल्क आकारण्यात येते. तसेच एम. एस्सी. (नॅनोटेक्नॉलॉजी) व एम. एस्सी. (इंटरप्रिनरशिप) हे अभ्यासक्रम नव्याने सुरु झालेले असल्याने व सदर अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क निश्चित झालेले नसल्याने दि. ०१/०७/२०२१ रोजीच्या टिपणी अन्वये, एम. एस्सी. (नॅनोटेक्नॉलॉजी) व एम. एस्सी. (इंटरप्रिनरशिप) या अभ्यासक्रमास शै. वर्ष २०२१-२२ करिता प्रत्येकी रु. १५०००/- इतके वार्षिक संलग्निकरण शुल्क आकारुन सदरच्या शुल्काचा विषय अधिष्ठाता मंडळामार्फत शुल्क निश्चिती समिती समोर ठेवून निश्चित करुन घेण्याकरिता मा. कुलगुरु महोदयांचे आदेश प्राप्त झाले आहेत. तसेच बी. व्होक. व एम. व्होक. हे अभ्यासक्रम नव्याने सुरु झालेले असल्याने बी. व्होक. व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क निश्चित केलेले नाही. तसेच एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाबाबतचे इतर शुल्क निश्चित केलेले नाही.<br>त्यानुषंगाने सदरील बाब दि. १९/०७/२०२१ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या विचारार्थ सादर केली असता, विषय क्र. ०२ अन्वये खालीलप्रमाणे ठराव पारीत झालेला आहे.<br>"बी.व्होक., एम. एस्सी. (नॅनोटेक्नॉलॉजी) व एम. एस्सी. (इंटरप्रिनरशिप) व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाबाबतचे इतर शुल्क खालीलप्रमाणे निश्चित करुन शुल्क समितीस शिफारस करण्यात आली."<br>१. वार्षिक संलग्निकरण शुल्क: | संलग्नता विभाग |

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | शुल्क (रुपये) |
|---|---|---|
| १. | बी. व्होक. | महाविद्यालय/अभ्यासक्रम स्थापनेच्या प्रथम वर्षी रु. ५०००/- व नंतरच्या प्रत्येक वर्षात प्रति विषय रु. १०००/- |
| २. | एम. एस्सी. (नॅनोटेक्नॉलॉजी) | रु.१५,०००/- |
| ३. | एम. एस्सी. (इंटरप्रिनरशिप) | रु.१५,०००/- |
| ४. | एम. व्होक. | महाविद्यालय/अभ्यासक्रम स्थापनेच्या प्रथम वर्षी रु. ५०००/- व नंतरच्या प्रत्येक वर्षात प्रति विषय रु. २०००/- |

२. एम. व्होक. अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाबाबतचे इतर शुल्क:

| Sr. No. | Degree | New Affiliation fee Rs. | New Subject Fee Rs. | Natural Extension Fee Rs. | Additional Division Fee Rs. | New Course Fee Rs. | Continuation of Affiliation fee Rs. | Permanent Affiliation Fee Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | M.Voc. | 10,000/- | 10,000/- Per Subject | 5,000/- | 5,000/- | 10,000/- | 5,000/- | 25,000/- |

उक्त ठरावाच्या अनुषंगाने बी. व्होक., एम. एस्सी. (नॅनोटेक्नॉलॉजी), एम.एस्सी. (इंटरप्रिनरशिप) व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाबाबतचे इतर शुल्क निश्चिती बाबत अधिष्ठाता मंडळाने शुल्क समितीस केलेली शिफारस दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या शुल्क निश्चिती समितीच्या विचारार्थ सादर केली असता, विषय क्र. १० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला होता.

"बी.व्होक., एम. एस्सी. (नॅनोटेक्नॉलॉजी), एम. एस्सी. (इंटरप्रिनरशिप) व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाबाबतचे इतर शुल्क निश्चिती बाबतचा विषय अधिष्ठाता मंडळाच्या फेर विचारार्थ पाठविण्याचा ठराव सर्वानुमते करण्यात आला."

शुल्क निश्चिती समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने उक्त नमूद बाब दिनांक १६/१२/२०२३ रोजीच्या मा. अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीमध्ये फेरविचारार्थ सादर केली असता, ठराव क्र. २ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला होता.

"बी. व्होक., एम.एस्सी. (नॅनोटेक्नॉलॉजी), एम.एस्सी. (इंटरप्रिनरशिप) व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे संलनिकरणाबाबतचे इतर शुल्क निश्चिती बाबत अधिष्ठाता मंडळाने शुल्क समितीस केलेली शिफारस सर्वानुमते मान्यता देऊन विद्यापरिषदेकडे सर्वानुमते शिफारस करण्यात आली."

सदरील शिफारशीच्या अनुषंगाने सदरील विषय दिनांक १८/०४/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यात आला होता. त्यानुसार सदरील बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव क्र. ७१ झालेला आहे.

"बी. व्होक., एम.एस्सी., (नॅनोटेक्नॉलॉजी), एम. एस्सी. (इंटरप्रिनरशिप) व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाबाबतचे इतर शुल्क निश्चिती बाबत अधिष्ठाता मंडळ व शुल्क समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."

सबब, बी. व्होक., एम. एस्सी. (नॅनोटेक्नॉलॉजी), एम. एस्सी. (इंटरप्रिनरशिप) व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाबाबतचे इतर शुल्क निश्चिती बाबत अधिष्ठाता मंडळ व शुल्क समितीने केलेली शिफारस विद्यापरिषदेने स्वीकारुन सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.

ठराव: **बी. व्होक., एम. एस्सी. (नॅनोटेक्नॉलॉजी), एम. एस्सी. (इंटरप्रिनरशिप) व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क व एम. व्होक. या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाबाबतचे इतर शुल्क निश्चिती बाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २० ] | **प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांकडून स्वीकारण्यात येणाऱ्या संलग्निकरण शुल्काबाबत अध्यादेश (Ordinance) तयार करुन त्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ७३ व ७४ अन्वये मा. कुलपतींची मान्यता घेणे आवश्यक असल्याने अधिष्ठाता मंडळाने सदरील अध्यादेशाचा (Ordinance) मसूदा तयार करुन व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.** | संलग्नता विभाग |

टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार / निरंतर संलग्निकरण / महाविद्यालयीन नावातील बदल तसेच महाविद्यालयातील विषय / अभ्यासक्रम / अतिरिक्त तुकडी / विद्याशाखा / महाविद्यालय बंद करण्यासंदर्भातील प्रस्तावाबाबत दिनांक १८/०७/२०२२ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. सदरील टिपणीवर तत्कालीन उपकुलसचिव यांनी खालीलप्रमाणे पृष्ठांकन केले आहे व त्यांस मा. कुलगुरुंनी मान्यता प्रदान केलेली आहे.

"संलग्निकरण संदर्भात शुल्काबाबत आदेश तयार (Ordinance) करुन त्यास म. सा. वि. अ. २०१६ कलम ७३ व ७४ अन्वये मा. कुलपतींची मान्यता घेणे आवश्यक आहे."

उक्त पृष्ठांकनाच्या अनुषंगाने संलग्नता विभागाकडील दि.२३/०५/२०२३ रोजीच्या कार्यालयीन टिपणीन्वये मा. कुलगुरु महोदयांची मान्यता घेवून Ordinance तयार करुन मिळण्यास्तव मूळ टिपणी प्रपत्रांसह कायदा विभागाकडे दि.०१/०६/२०२३ रोजी अग्रेषित करण्यात आली होती. तद्नंतर कायदा विभागाने दि.०८/०६/२०२३ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये म. सा. वि. अ. २०१६ कलम ७३ मध्ये नमूद केलेल्या बाबींशी संबंधित आदेशांचा मसूदा तयार करुन प्रस्तावित करण्यासाठी सदरचा विषय अधिष्ठाता मंडळाकडे जाणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. त्याअनुरोधाने संलग्निकरण शुल्काबाबत अध्यादेश तयार (Ordinance) करण्यासाठी अध्यादेशाचा (Ordinance) मसूदा कायदेशीर बाबींसह कायदा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडून तयार करुन घेवून तद्नंतर मा. अधिष्ठाता मंडळाच्या समोर सादर करण्याची बाब अधिष्ठाता मंडळाच्या दि.०४/०९/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये विचारार्थ सादर केली असता खालीलप्रमाणे ठराव झाला होता.

"महाविद्यालयांकडून स्विकारण्यात येणाऱ्या संलग्निकण शुल्काबाबत Ordinance तयार करण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती नेमण्यात आली."

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. लक्ष्मीकांत दामा | अध्यक्ष |
| २. | डॉ. प्रशांत पवार | सदस्य |
| ३. | ॲड. जावेद अहमद म. हनीफ खैरदी | सदस्य-सचिव |

त्यानुषंगाने दि.३०/११/२०२३ रोजी सदरील समितीची संलग्निकरण शुल्काबाबत Ordinance तयार करण्यासाठीची बैठक झाली होती. परंतू, दरम्यानच्या कालावधीत समितीचे अध्यक्ष प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब. दामा यांची प्रस्तुत विद्यापीठाच्या प्र-कुलगुरु पदी नियुक्ती झालेली असून, डॉ. दामा सर हे विद्यापीठाच्या सेवेत रुजू झालेले आहेत. त्यामुळे दि.२२/०२/२०२४ रोजी फेरसादर केलेल्या टिपणीवरील प्राप्त आदेशानुसार, पर्यायी अध्यक्षांचे नामनिर्देशनाची बाब दि.०७/०३/२०२४ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीमध्ये विचारार्थ सादर केली असता, अधिष्ठाता मंडळाच्या ठराव क्र. ५(२) अन्वये अध्यादेशाचा (Ordinance) मसूदा तयार करणेकामी समितीचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. शिवाजी शिंदे-प्रभारी अधिष्ठाता वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांचे नामनिर्देशन प्राप्त झाले होते.

परंतू, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या विभागाच्या दि.२६/०३/२०२४ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये दि.१८/०३/२०२४ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या

बैठकीमधील विषयामध्ये प्र-कुलगुरु हे पद कायम स्वरुपात भरले आहेत. सदर अधिष्ठाता मंडळाचे अध्यक्ष हे प्र-कुलगुरु असतात व सदस्य सचिव हे नवोपक्रम, नवसंशोधन मंडळाचे संचालक असतात. त्यामुळे ७४/३ नुसार Ordinanace तयार करावयाचे अधिकार अधिष्ठाता मंडळाचे असतात. सध्यस्थितीत अधिष्ठाता मंडाळाची रचना खालीलप्रमाणे आहे, असे नमूद करुन कळविले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत दामा, प्र-कुलगुरु,<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. | अध्यक्ष |
| २. | डॉ. प्रशांत पवार, प्रभारी अधिष्ठाता-विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ३. | डॉ. शिवाजी शिंदे<br>प्रभारी अधिष्ठाता-वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| ४. | डॉ. वसंत कोरे, प्रभारी अधिष्ठाता-मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ५. | डॉ. राजशेखर हिरेमठ<br>प्रभारी अधिष्ठाता- आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| ६. | डॉ. मेंते आर. एस., सहयोगी अधिष्ठाता-विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ७. | डॉ. इ. जा. तांबोळी, सहयोगी अधिष्ठाता-मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ८. | डॉ. विठ्ठल किडगांवकर<br>सहयोगी अधिष्ठाता-आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| ९. | प्रा. डॉ. विकास बा. पाटील<br>प्र. संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, | सदस्य-सचिव |

दि.१८/०३/२०२४ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. ५(३) खालीलप्रमाणे आहे.

"अधिष्ठाता मंडळाच्या दि.०४/०९/२०२३ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र २ नुसार संलग्निकरण शुल्काबाबत संदर्भात Ordinance महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७४(२) नुसार अधिष्ठाता मंडळामार्फत Ordinance तयार करण्याचे सर्वानुमते ठरले".

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने विषय संलग्नता विभागामार्फत सादर करण्यात आलेला नसून थेट ठराव झालेला आहे. यास्तव दि.०५/०६/२०२४ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीमध्ये संलग्निकरण शुल्काबाबत Ordinance तयार केले असून खालीलप्रमाणे ठराव क्र. २ केला आहे.

"प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांकडून स्वीकारण्यात येणाऱ्या संलग्निकरण शुल्काबाबत अध्याआदेश (Ordinance) तयार करुन त्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ७३ व ७४ अन्वये सदरील अध्यादेशाचा (Ordinance) मसूद्यास दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देऊन व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."

सबब, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांकडून स्वीकारण्यात येणाऱ्या संलग्निकरण शुल्काबाबत अध्यादेश (Ordinance) तयार करुन त्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७३ व ७४ अन्वये मा.कुलपतींची मान्यता घेणे आवश्यक असल्याने अधिष्ठाता मंडळाने सदरील अध्यादेशाचा (Ordinance) मसूदा तयार करुन व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.

**ठराव:** **प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांकडून स्वीकारण्यात येणाऱ्या संलग्निकरण शुल्काबाबत अध्यादेश (Ordinance) तयार करुन त्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७३ व ७४ अन्वये अधिष्ठाता मंडळाने सदरील अध्यादेशाचा (Ordinance) मसूदा तयार करुन व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारुन मा.कुलपतींची मान्यता घेण्यासाठी दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[२१(१)]</td><td>विविध साहित्य प्रकारांकरीता लोकप्रिय कविवर्य पुरस्कार योजना सुरु करणेबाबतचा विषय विचारार्थ.<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामार्फत मराठीतील उत्कृष्ट व लोकप्रिय साहित्यिक, उत्कृष्ट साहित्यकृतीसाठी तसेच लोकप्रिय कविवर्य पुरस्कार योजना सुरु करुन साहित्यिकांच्या सेवेची व त्यांच्या साहित्यकृतींची दखल घ्यावी. त्यांच्या साहित्य सेवेला प्रेरणा, प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या विद्यापीठामार्फत दरवर्षी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीत प्रकाशित होणाऱ्या काव्यसंग्रह, कथासंग्रह, कादंबरी, समिक्षा ग्रंथ, आत्मचरित्र, नाटक, समग्र साहित्य इत्यादी साहित्य प्रकारांसाठी स्वतंत्र पुरस्कार सुरु करुन साहित्यिकांना गौरविण्यात यावे, सदरचे पुरस्कार मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून दरवर्षी छत्रपती संभाजी महाराज थोर साहित्यिक असल्याने त्यांच्या नावाने प्रदान करण्यात यावेत अशी मागणी केलेली आहे.<br>सदरची योजना आपल्या विद्यापीठाच्या नावलौकिकात भर घालणारी असून साहित्यिकांबरोबरच विद्यापीठालाही गौरवास्पद आहे. यामुळे अनेक साहित्यिक प्रेरणा घेऊन उत्तमोत्तम साहित्यकृती लिहितील आणि मराठी साहित्य संपदा समृध्द होईल, याकरीता विविध साहित्य प्रकारांकरीता लोकप्रिय कविवर्य पुरस्कार योजना सुरु करण्यास मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिलेली आहे.<br>तरी वरीलप्रमाणे साहित्य सेवेला प्रेरणा, प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या विद्यापीठामार्फत दरवर्षी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीत प्रकाशित होणाऱ्या काव्यसंग्रह, कथासंग्रह, कादंबरी, समिक्षा ग्रंथ, आत्मचरित्र, नाटक, समग्र साहित्य इत्यादी साहित्य प्रकारांसाठी लोकप्रिय कविवर्य पुरस्कार योजना सुरु करुन मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून दरवर्षी छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने लोकप्रिय कविवर्य पुरस्कार प्रदान करण्याची बाब विचारार्थ.</td><td>विद्यार्थी विकास मंडळ</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>सदर विषयासंदर्भात सखोल अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सदस्याचे नांव</th><th>पदनाम</th></tr>
<tr><td>१.</td><td>डॉ. वसंत गुरुशांत कोरे<br>प्र.अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२.</td><td>अध्यक्ष/समन्वयक, मराठी अभ्यासमंडळ</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३.</td><td>डॉ. आय. जे. तांबोळी<br>मराठी अभ्यासमंडळातील मा.कुलगुरु नियुक्त सदस्य</td><td>सदस्य</td></tr>
</table>
सदर समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २१(२)] | **दि.१२/०६/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.१२/०६/२०२४ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>विद्यापीठ परिनियम S.३३९(f) नुसार दि.१२/०६/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br>सबब, दि.१२/०६/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **दि.१२/०६/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २१(३)] | विद्यापीठातील मुलांचे व मुलींचे वसतिगृहासाठी मेस पुरवठादार (Provider) नसल्याने तात्पुरत्या स्वरुपात उपहारगृह पुरवठादार यांना पुरवठा आदेश देण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | विद्यापीठ परिसरातील मुलांचे व मुलींचे वसतिगृहामध्ये नियमित मेस पुरवठादार नेमण्यासाठी लवकरात लवकर निविदा प्रक्रिया करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच वसतिगृहातील विद्यार्थी यांचे हित पाहता, नियमित मेस पुरवठादार यांची नेमणूक होईपर्यंत उपहारगृह पुरवठादार यांना पुरवठा आदेश देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद